CNR No.MHTH130000092026

## दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१/२०२६

श्री सागर अमरलाल शामदासाणी व इतर ..... **अर्जदार**

विरूध्द

कोणीही नाही ..... **सामनेवाले**

**नि.१ वरील आदेश**
**(पारीत दिनांक २८/०७/२०२६)**

१. अर्जदार क्र.१ ते ८ यांनी प्रस्तुतचा अर्ज मुंबई नियमन कायदा, १८२७ अन्वये वारस दाखला (Heirship Certificate) मिळणेकरिता दाखल केलेला आहे.

२. **अर्जातील कथने थोडक्यात पुढीलप्रमाणे :—**

अर्जदार क्र.३ यांचे पती व अर्जदार क्र.१, २ व ४ ते ८ यांचे वडील अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचा दिनांक २२/०७/२०१८ रोजी उल्हासनगर—५ येथे मृत्यू झालेला आहे. अमरलाल सुजानदास शामदासाणी यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच फक्त त्यांचे कायदेशीर वारस असून त्या व्यतिरिक्त अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. दैनंदिन वापरातील सरकारी कागदपत्रांवरील मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचे नाव कमी करुन त्या ठिकाणी वारस म्हणून अर्जदारांची नांवे लावण्यासाठी अर्जदारांकडे वारस दाखल्याची मागणी करण्यात आली. म्हणून अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज वारस दाखला मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

३. अर्जदार यांनी सदर अर्जाचे पुष्टयर्थ दैनिक 'ठाणे वैभव' या वृत्तपत्रात नि.२३ प्रमाणे जाहीर नोटीस दिनांक १७/०२/२०२६ रोजी प्रसिद्ध करुन हरकती मागविण्यात आल्या होत्या. परंतु, नमूद कालबद्धतेत कोणतीही हरकत नोंदविण्यात आलेली नाही. तसेच जाहीरनामादेखील प्रसिद्ध करण्यात आला असता कोणतीही हरकत प्रस्तुतचे अर्जात नोंदविण्यात आलेली नाही.

४. अर्जदार क्र.१, २, ५ व ६ यांनी अनुक्रमे नि.७, १०, ११ व १२ नुसार आपल्या अर्जाच्या पुष्टयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रांमध्ये मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचे दिनांक २२/०७/२०१८ रोजी निधन झाले असून त्यांना अर्जदार यांच्याशिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नसल्याचे नमूद केले आहे. अर्जदार यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

५. अर्जात दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांनी आपल्या अर्जाच्या पुष्टयर्थ नि.१३ वर मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचे मृत्यू प्रमाणपत्र, नि.१४ वर मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांची कौटुंबिक शिधापत्रिका, नि.१५ ते २२ वर अर्जदार क्र.१ ते ८ यांचे आधार कार्ड, नि.२५ वर मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांची आई ग्यानीबाई सुजानदास शामदासाणी यांचा मृत्यू दिनांक २८/०३/२०२२ रोजी झालेला असून त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याबाबत अर्जदार क्र.१ चे प्रतिज्ञापत्र इत्यादी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत.

६. अभिलेखावर दाखल केलेल्या मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन करता मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचे दिनांक २२/०७/२०१८ रोजी निधन झाल्याचे स्पष्ट होते. तसेच अर्जातील आलेल्या पुराव्यावरुन व कोणतीही हरकत नोंदविली गेलेली

नसल्याने अर्जदार हे मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचे कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थितीत अर्जदार यांचा वारस दाखला मिळणेकामीचा अर्ज मंजूर करण्यास कोणतीही अडचण नाही. करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो—

## आ दे श

१) अर्जदार यांचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ **श्री सागर अमरलाल शामदासाणी**, अर्जदार क्र.२ **श्री धिरजकुमार अमरलाल शामदासाणी**, अर्जदार क्र.३ **श्रीमती शारदा अमरलाल शामदासाणी**, अर्जदार क्र.४ **सौ. हिना उत्तमचंद लोहाणा उर्फ ज्योती अमरलाल शामदासाणी**, अर्जदार क्र.५ **सौ. पुनम विनोदकुमार आहुजा उर्फ नितू अमरलाल शामदासाणी**, अर्जदार क्र.६ **सौ. पुजा सुनिल आडवाणी उर्फ पिंकी अमरलाल शामदासाणी**, अर्जदार क्र.७ **सौ. रोमा मुकेश गेलाणी उर्फ हेमा अमरलाल शामदासाणी** व अर्जदार क्र.८ **सौ. भाविका मनिष भागदेवाणी उर्फ पुना अमरलाल शामदासाणी** हे मयत अमरलाल सुजानदास शामदासाणी यांचे कायदेशीर वारस असल्याचे उद्घोषित करण्यात येते.

३) अर्जदार यांनी नियमाप्रमाणे आवश्यक ती कोर्ट फी न्यायालयात जमा केल्यानंतर त्यांना वारस दाखला (Heirship Certificate) देण्यात यावा.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

ROHINI ASHOK JADHAV
Digitally signed by ROHINI ASHOK JADHAV

उल्हासनगर,
दिनांक — २८/०७/२०२६

( रोहिणी अ. जाधव )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
उल्हासनगर.